☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट /228/ पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 08/06/2025

# नांदेड जिल्हयातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे इसमांवर मास रेडचे आयोजन करून एकुण 4,26,375/–रूपयाचा मुद्देमाल केला जप्त..

## पोलीस अधीक्षक नांदेड यांची कारवाई

नांदेड जिल्हयातील अवैध व्यवसाय पुर्णतः बंद करण्यासंबधाने ऑपरेश फ्लश ऑऊट अंतर्गत नांदेड जिल्हयातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे इसमां विरूध्द कारवाई करण्यासाठी मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी दिनांक 08.06.2025 रोजी मास रेडचे आयोजन केले होते.

सदर मास रेड कामी मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली मा श्री खंडेराव धरणे, अपर पोलीस अधीक्षक, भोकर, मा.श्री.सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, यांचेसह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता.

सदर मास रेड दरम्यान अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे लोकांचे ठिकाणावर छापा टाकुन समुळ उच्चाटन करण्यासाठी राबविलेल्या मोहीमेमध्ये नांदेड जिल्हयात एकुण 115 गुन्हे दाखल करून एकुण 115 आरोपीतांवर कारवाई करत एकुण 4,26,375/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड